महाराष्ट्राचा हक्काचा आवाज

दैनिक बीड लोकनेता

Lokneta News - लोकनेता न्युज

● मुख्य संपादक : ज्ञानेश्वर मुंढे ●

गुरुवार १८ जून २०२६ RNI-MAHMAR/2023/89402 Email : dnyaneshmofficial@gmail.com वर्ष : ०३ अंक : २९७ किंमत २ रुपये 7499615933




# ऑपरेशन सक्सेस, पण वेट अँड वॉच, ठाकरेंच्या त्या खेळीचा धसका

**उद्धव ठाकरे यांच्या पक्षाच्या गटातील ६ खासदारांनी पक्षाची साथ सोडल्यानंतर ऑपरेशन टायगर यशस्वी झाल्याचे बोलले जात आहे. असं असलं तरी कायदेशीर आव्हानांमुळे शिवसेना सध्या वेट अँड वॉच भूमिका घेत असल्याची माहिती समोर आली आहे.**

लोकनेता न्युज नेटवर्क




राज्याच्या राजकारणात खळबळ उडाली आहे, 6 खासदारांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची साथ सोडण्याचा निर्णय घेतला आहे. हे खासदार शिवसेनेत प्रवेश करणार असल्याची माहिती समोर आली आहे. आज ठाकरेंचा पक्ष फुटल्यानंतर ऑपरेशन टायगरची संपूर्ण देशात चर्चा सुरू आहे. मात्र आता हे ऑपरेशन काही काळ रखडले जाण्याची शक्यता आहे. कारण शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून कायदेशीर लढाई लढली जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे शिवसेनेकडून वेट अँड वॉचची भूमिका घेतली जात असल्याची माहिती समोर आली आहे.

शिवसेना वेट अँड वॉचच्या भूमिकेत समोर आलेल्या माहितीनुसार, आज झालेले ऑपरेशन टायगर फुल प्रूफ झालेले असून, त्यात काहीही अडचण नाही. मात्र आता लगेच काहीही जाहीर करायचे नाही. कोणतेही पुरावे द्यायचे नाही, अशी वेट अँड वॉचची भूमिका शिवसेनेनी घेतली आहे. कारण यामागे काही तांत्रिक गोष्टी आहेत. ठाकरे गटाचे कायदेशीर डावपेच बघूनच पुढील पाऊले टाकली जाणार असल्याचे समोर आले आले आहे. पुढील 2 दिवस तरी अधिकृतरित्या काहीही समोर आणले जाणार नाही अशी माहिती शिवसेनेच्या वरिष्ठ सुत्रांकडून देण्यात आली आहे. कायदेशीर बाबी तपासल्या जाणार समोर आलेल्या माहितीनुसार, उपमुख्यमंत्री आणि शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे हे ठाण्यात दाखल झाले आहेत, मात्र ते माध्यमांशी संवाद साधणार नाहीत. कायदेशीर बाबी लक्षात घेता तूर्तास या सहा खासदारांचा प्रवेश दोन ते तीन दिवस लाबंणीवर पडला असल्याचे सूत्रांनी सांगितले आहे. ठाकरे गटाकडून येणाऱ्या आक्षेपांवर आधी काम केला जाणार आणि नंतर टेक्निकल आणि कायदेशीर बाजू तपासून शिवसेना या सहा खासदारांच्या पक्ष प्रवेशाची अधिकृत घोषणा करणार असल्याची माहिती समोर आली आहे. सध्या ठाकरेंची साथ सोडणाऱ्या 6 खासदारांना सुरक्षेच्या कारणास्तव दिल्लीतून बाहेर हलवल्याची माहितीही सूत्रांनी दिली आहे.

## ठाकरेंचे कोणते खासदार फुटले?

हिंगोलीचे खासदार नागेश पाटील आष्टीकर, शिर्डीचे खासदार भाऊसाहेब वाघचौरे, उत्तर पूर्व मुंबईचे शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय दिना पाटील, वाशिमचे खासदार संजय देशमुख, धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर आणि परभणीचे खासदार संजय जाधव यांनी उद्धव ठाकरेंची साथ सोडली आहे.




# आता थेट मेडिकलमधून कफ सिरफ मिळणार नाही, औषध खरेदीसाठी: मुलांच्या मृत्यूनंतर सरकारचा मोठा नियम

लोकनेता न्युज नेटवर्क

आता कफ सिरफ मेडिकलमध्ये सहज उपलब्ध नसणार... सरकारने मोठा निर्णय घेतल्यानंतर कप सिरफच्या विक्रीवर नवीन बंधणं लादण्यात आली आहेत. कफ झाल्यानंतर अनेक प्रकारचे सिरफ मेडिकलमधून सहज उपलब्ध व्हायचे. पण आता तसं होणार नाही. कारण कफ सिरफसाठी आता डॉक्टरांचं प्रिस्क्रिप्शन अनिवार्य असणार आहे. केंद्र सरकारने 'ड्रग्ज रूल्स, 1945' मध्ये सुधारणा करून सिरपच्या 'ओव्हर-द-काउंटर' (OTC) विक्रीवर बंदी घालण्याचा निर्णय घेतला आहे. नवीन नियम लागू झाल्यानंतर, फार्मसीमधून सिरप खरेदी करण्यासाठी नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिकाने दिलेले प्रिस्क्रिप्शन म्हणजे औषधाची चिठ्ठी असणं अनिवार्य असेल.

केंद्र सरकारने 9 जून 2026 रोजी जारी केलेल्या अधिसूचनेद्वारे ' Drugs (Fifth Amendment) Rules, 2026 ' लागू केलं आहेत. ही सुधारणा Drugs and Cosmetics Act, 1940 च्या कलम 12 आणि 33 अन्वये करण्यात आली असून, अधिकृत राजपत्रात प्रकाशित झाल्यापासून ती अंमलात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कफ सिरप आणि इतर औषधी सिरप खरेदी करण्यासाठी ग्राहकांना नोंदणीकृत डॉक्टरांनी दिलेलं प्रिस्क्रिप्शन मेडिकलमध्ये सादर करणं आवश्यक असेल. अशात सरकारने घेतलेल्या निर्णयाचा परिणाम, सिरपच्या नियमित खरेदीवर होईल. कारण यापूर्वी कफ सिरफ मेडिकलमधून थेट खरेदी करता येत होतं.



मुलांच्या मृत्यूनंतर मोठा निर्णय...
मध्य प्रदेश आणि राजस्थान येथे दुषित कफ सिरफ घेतल्यामुळे मुलांचं निधन झालं होतं. त्यानंतर औषधांची गुणवत्ता आणि देखरेखीवर अनेक प्रश्न निर्माण करण्यात आले. या घटनेनंतर सिरपच्या निर्मिती आणि विक्रीवर मोठा निर्णय घेण्यात आला आहे. एवढंच नाही तर, या सुधारणेचा मसुदा 30 डिसेंबर 2025 रोजी जारी करण्यात आला होता आणि त्याबाबत सामान्य जनतेकडून हरकती व सूचना मागवण्यात आल्या होत्या. प्राप्त झालेल्या सूचनांचा विचार केल्यानंतर अंतिम सुधारणेची अधिसूचना जारी करण्यात आल्याचं सरकारने नमूद केलं आहे.

आरोग्य आणि कुटुंब कल्याण विभागाचे सहसचिव हर्ष मंगला यांनी जारी केलेल्या अधिसूचनेनुसार, देशभरातील सर्व देशभरातील फार्मसींना आता सिरप विक्रिबाबतच्या नव्या नियमांचं पालन करावं लागणार आहे. नव्या नियमांनुसार, डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय कोणतंही सीरप ग्राहकांना खरेदी करता येणार नाही.

# घरफोडी करणारा सराईत आरोपी जेरबंद.



लोकनेता न्यूज नेटवर्क

बीड, दि. 17 – बीड शहरातील दोन घरफोडीच्या गुन्ह्यांची उकल करण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश आले असून सराईत आरोपी कलीम अलीम शेख (वय 32, रा. दहीफळ, ता. जि. बीड) याला अटक करण्यात आली आहे. आरोपीकडून घरफोडीसाठी वापरलेली दुचाकी तसेच चोरीतील नगदी मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.




# वझरग्यात गुटखा – पान मसाला साठा जप्त

लोकनेता न्यूज नेटवर्क
देगलूर प्रतिनिधी/संतोष चिद्रावार लोणीकर

महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा पान मसाला व सुगंधित तंबाखूजन्य पदार्थाचा साठा करून त्याची अवैध विक्री करण्याच्या उद्देशाने ठेवलेल्या एका किराणा दुकाना विरुद्ध देगलूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
या कारवाईमुळे देगलूर शहर व परिसरातील तंबाखू विक्रेत्यामध्ये खळबळ उडाली आहे.



पोलीस ठाणे देगलूर येथे गु. र. नं.३०३/२६ नोंद करण्यात आला आहे. याबाबतची फिर्याद पोलीस जमादार अशोक घूमे यांनी दिल्याने आरोपी भानुदास कोकणे किराणा दुकान चालक रा. वझरगा तालुका देगलूर याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून दि. 16 जून रोजी सायंकाळी वझरगा येथील 'जय मल्हार'नावाच्या तीन पत्र्याच्या दुकानात छापा टाकण्यात आला.
त्यावेळी शासनाने प्रतिबंधित केलेल्या गुटखा, पान मसाला व सुगंधी तंबाखूजन्य पदार्थाचा एकूण आठ हजार 163 रुपयाचा साठा आढळून आला. सदर मला अवैधरित्या साठवून विक्रीसाठी ठेवण्यात आल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे.
महाराष्ट्र राज्याचे अन्नसुरक्षा आयुक्त यांनी अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ अंतर्गत जारी केलेल्या अधिसूचनेनुसार अशा पदार्थांची निर्मिती, साठवणूक, वितरण, वाहतूक व विक्री करण्यास बंदी आहे. पुढील तपास खानापूर बीटचे पोलीस उपनिरीक्षक हाणमंत शिंदे हे करीत आहेत.

# मृग नक्षत्र कोरडे; हिमायतनगर तालुक्यात पावसाची हुलकावणी,बळीराजाचे डोळे आकाशाकडे!

लोकनेते न्यूज नेटवर्क
हिमायतनगर लक्ष्मण शेन्नेवाड

जुन महिन्याचा पंधरवडा उलटुन गेला तरी हिमायतनगर तालुका व संपूर्ण नांदेड जिल्ह्यात मान्सुनला अपेक्षित वेग मिळालेला नाही सुरूवातीला झालेल्या तुरळक सरीनंतर पावसाने पूर्णपणे दांडी मारल्याने तालुक्यातील बळीराजा चिंतेत सापडला असुन खरीप हंगामातील पेरण्या खोळंबल्या आहेत.दिवसभर केवळ ढगाळ



वातावरण आणि उन्हाचा चटका कायम असल्याने शेतकरी आता दमदार पावसाची चातकासारखी प्रतीक्षा करत आहे. तालुक्यातील बहुतांश शेतकऱ्यांनी मे महिन्यांपासून शेतजमीनीची मशागत करून ठेवली आहे.कृषी सेवा केंद्रामधून महागडी बियाणे आणि खतांची खरेदी करून शेतकरी पावसाची वाट पाहत आहेत.मात्र मृग नक्षत्र कोरडे गेल्याने आणि जूनच्या तिसऱ्या आठवड्या मध्येही पावसाने दडी मारल्याने पेरणीचा मुहूर्त हुकला आहे.जिल्ह्यात यंदा अपेक्षित पर्जन्यमानाच्या तुलनेत कमालीची घट नोंदवण्यात आली आहे.
पाऊस लांबल्यामुळे केवळ शेतीचाच नाही ,तर ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचा आणी जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्नही गंभीर होऊ लागला आहे. पाणीपातळीत मोठी घट झाल्यामुळे विहिरी , बोअरला सुद्धा पाणी घटल्याचे दिसून येत आहे.हवामान विभागाने पुढील काही दिवसांत पावसाची शक्यता वर्तवली असली ,तरी प्रत्यक्ष पाऊस पडत नाही तोपर्यंत हिमायतनगर तालुक्यातील शेतकऱ्यांचे डोळे हे आकाशाकडेच असतील.

## संपादकीय

# हिमालयात चायनीज वनस्पतीचा धोका!”

'चायनीज स्टेलेरा' तथा 'हिमालियन स्टेलेरा' ही एक आकर्षक वाटणारी वनस्पती आहे.ही वनस्पती पांढऱ्या,गुलाबी किंवा पिवळसर रंगाच्या आकर्षक फुलांचा गुच्छांनी नटलेली असते. आक्रमक विस्तारणारी ही वनस्पती 'अॅलेलोपॅथी 'या प्रक्रियेचा वापर करते.ती आपल्या मुळांमधून आणि पानांमधून एक असे विशिष्ट रासायनिक द्रव्य उत्सर्जित करते,जे शेजारील इतर वनस्पतींसाठी मारक ठरते.या रासायनिक प्रक्रियेमुळे तिच्या आसपास उगवणाऱ्या इतर स्थानिक वनस्पती आणि उपयुक्त औषधी गवत पूर्णपणे नष्ट करते,ज्यामुळे संपूर्ण कुरण ओसाड बनू शकते.ही वनस्पतीचे विष इतके तीव्र असते की,जर एखाद्या पाळीव प्राण्याने किंवा मानवाने याचे अनवधानाने सेवन केले,तर त्याचा मृत्यूदेखील होऊ शकतो.इतकेच नव्हे तर या वनस्पतीची पाने हाताने चुरघळून केवळ त्याचा सुवास घेतला तरी माणसाला तत्काळ चक्कर किंवा भोवळ येण्याचा धोका असतो.

या देखण्या रूपाच्या मागे असे विषारी वास्तव दडलेले आहे.

उत्तराखंडमधील पिथौरागड जिल्ह्यातील दारमा आणि व्यास व्हॅलीजवळ छियालेख बुग्याल आणि आदि कैलास यात्रा मार्गाजवळ वन विभागाच्या रिसर्च विंगमधील शास्त्रज्ञांना आणि जेआरएफ (ज्युनिअर फेलो)मनोज यांना या वनस्पतीचे अस्तित्व आढळले. यापूर्वी चामोली जिल्ह्यातील मल्लारी क्षेत्रात आणि नंदा देवी राष्ट्रीय उद्यानाच्या आसपास या वनस्पतीची काही तुरळक रोपे आढळल्याची नोंद होती,परंतु या विशिष्ट व्हॅलीमध्ये पूर्णपणे बहरलेली,फुलांनी सजलेली झाडे आढळण्याची ही पहिलीच वेळ आहे.ही वनस्पती पांढऱ्या, गुलाबी किंवा पिवळसर रंगाच्या आकर्षक फुलांच्या गुच्छांनी नटलेली असते,ज्यामुळे निसर्गाची शोभा वाढल्यासारखा भास होतो.मात्र हा केवळ एक निसर्गाचा विरोधाभास आहे.वरकरणी अत्यंत देखणी आणि आकर्षक वाटणारी ही वनस्पती प्रत्यक्षात स्थानिक वनस्पती व जैवविविधतेसाठी अत्यंत घातक असल्याचे समोर आल्याने वन संशोधन शाखा आणि पर्यावरण तज्ज्ञांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. चीनमध्ये पारंपारिक औषधे तयार करण्यासाठी हिच्या मुळांचा मर्यादित वापर केला जात असला तरी तिचे अनियंत्रित पसरणे हे तिथल्याही गवताळ प्रदेशाच्या ऱ्हासाचे प्रमुख लक्षण मानले जाते.आता हाच पॅटर्न भारताच्या हिमालयात पाहायला मिळत असल्याने शास्त्रज्ञांचे धाबे दणाणले आहेत.

भारतात ही वनस्पती एवढ्या वेगाने का पसरत आहे,याचे मूळ जागतिक तापमानवाढ आणि हवामान बदलामध्ये दडलेले आहे. हिमालयातील तापमान सातत्याने वाढत असून बर्फ वितळण्याचे प्रमाण वाढले आहे.कोरड्या आणि कडक हवामानात तग धरण्याची प्रचंड क्षमता चायनीज स्टेलेरामध्ये असते.तिची मुळे मातीत खोलवर रूजलेली असतात, ज्यामुळे पाण्याचे दुर्भिक्ष असले तरी ती सहज जिवंत राहते.अति-चरई मुळे जेव्हा स्थानिक गवत कमकुवत होते, तेव्हा या विषारी वनस्पतीला मोकळे रान मिळते.छियालेख बुग्यालमध्ये हिचा झालेला मोठा प्रसार हा हिमाययातील नैसर्गिक संतुलनात बिघाड झाल्याचा धोक्याचा इशारा आहे.

उपग्रह तंत्रज्ञान आणि प्रत्यक्ष क्षेत्रीय सर्वेक्षणाच्या माध्यमातून या वनस्पतीचा प्रसार कुठे आणि किती प्रमाणात झाला आहे, याचा अचूक नकाशा तयार करणे आवश्यक आहे. निसर्गातील प्रत्येक घटकाचे एक चक्र असते.मात्र जेव्हा एखादी परकीय किंवा आक्रमक प्रजाती स्थानिक पर्यावरणाचा गळा घोटू लागते,तेव्हा मानवी हस्तक्षेप आणि शास्त्रीय व्यवस्थापन अनिवार्य ठरते.आदि कैलास क्षेत्रात उमललेली ही चिनी फुले हिमालयाचे सौदर्य वाढवणारी नसून भविष्यातील मोठ्या संकटाची नांदी आहेत. वन विभाग आणि पर्यावरणप्रेमींनी एकत्र या 'चायनीज स्टेलेरा ' च्या आव्हानाना वेळीच मुकाबला केला पाहिजे, तरच हिमालयाची पावन भूमी आणि तिची वनसंपदा सुरक्षित राहील.

# पुनर्वसन आधी, धरण नंतर; गारगाई धरणग्रस्तांच्या हक्कांसाठी निर्णायक आढावा बैठक

**लोकनेता न्युज नेटवर्क**

पालघर - श्री तुषार भोईर

वाडा : पालघर जिल्ह्यातील वाडा तहसील कार्यालयात दिनांक १६ जून २०२६ रोजी श्रमजीवी संघटनेचे संस्थापक तथा महाराष्ट्र शासनाच्या राज्यस्तरीय आदिवासी आढावा समितीचे अध्यक्ष (मंत्री दर्जा) मान. विवेक भाऊ पंडित यांच्या उपस्थितीत गारगाई धरण प्रकल्पग्रस्त गावांबाबत महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली.

गारगाई धरण प्रकल्पामुळे खोडदे, ओगदा, निळमाळ, फणसगाव, पाचघर ही पाच मुख्य गावे तसेच त्याअंतर्गत असलेले १४ पाडे थेट प्रभावित होणार आहेत. विशेष म्हणजे ही सर्व गावे व पाडे शंभर टक्के आदिवासी वस्तीची असून येथील नागरिकांचे जीवन, संस्कृती, परंपरा, शेती, जंगल आणि नैसर्गिक साधनसंपत्तीशी अतूट नाते आहे.

धरणाचे काम सुरू होण्याच्या मार्गावर असताना प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबत शासनाने अद्याप कोणतीही स्पष्ट भूमिका





जाहीर केलेली नसल्याने स्थानिक ग्रामस्थांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. या पार्श्वभूमीवर प्रकल्पग्रस्त ग्रामस्थांच्या मागण्या, कायदेशीर हक्क, भूसंपादन प्रक्रिया, पुनर्वसन आणि भविष्यातील परिणाम यांचा सविस्तर आढावा घेण्यासाठी या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

बैठकीत “जमिनीच्या बदल्यात जमीन” हा प्रकल्पग्रस्तांचा मूलभूत हक्क असल्याची ठाम भूमिका मांडण्यात आली. केवळ आर्थिक भरपाई देऊन प्रश्न सुटणार नसून प्रभावित कुटुंबांना त्यांच्या उपजीविकेची हमी देणारी पर्यायी जमीन, पुनर्वसनासाठी आवश्यक सुविधा आणि सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळाला पाहिजे, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

यावेळी मान. विवेक भाऊ पंडित यांनी प्रकल्पग्रस्तांचे योग्य पुनर्वसन, पर्यायी जमीन आणि त्यांच्या हक्कांचे संरक्षण सुनिश्चित केल्याशिवाय कोणताही विकास प्रकल्प न्याय्य ठरू शकत नाही, असे स्पष्ट केले. आदिवासी, शेतकरी आणि भूमिपुत्रांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी श्रमजीवी संघटना सातत्याने संघर्ष करत राहील, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

या बैठकीस उपविभागीय अधिकारी संदीप चव्हाण, तहसीलदार भाऊसाहेब अंधारे,शरद पाटील ज्येष्ठ पत्रकार, सहाय्यक वनसंरक्षक डेंबरे तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेचे अभियंते उपस्थित होते.

तसेच श्रमजीवी संघटना महाराष्ट्राच्या अध्यक्षा मान. सीता ताई घाटाळ, सरचिटणीस मान. विजय भाऊ जाधव, पालघर जिल्हा महिला प्रमुख रेखा ताई पऱ्हाड, जिल्हा उपाध्यक्ष वसंत पवार, वाडा तालुका अध्यक्ष भरत जाधव, तालुका सचिव सुरज दळवी, तालुका उपाध्यक्ष देवेंद्र वाघ, बाळू लहांगे, सुजाता पारधी, तालुका महिला प्रमुख सुगंधा विघ्ने, तालुका महिला उपप्रमुख मीरा टोकरे, माजी तालुका उपाध्यक्ष मोतीराम वारे, गणपत टोकरे आणि संतोष खानजोडे आदी उपस्थित होते.

बैठकीत गारगाई धरण प्रकल्पग्रस्तांना न्याय्य पुनर्वसन, पर्यायी जमीन आणि त्यांच्या हक्कांचे संपूर्ण संरक्षण मिळवून देण्यासाठी पुढील काळात आवश्यक ती भूमिका घेण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

# झरी ग्रामपंचायतीतील कथित आर्थिक गैरव्यवहारांची सखोल चौकशी करा..केवळबाई वाघमारे सरपंच झरी

## जलजीवन मिशन अंतर्गत कामाची चौकशी करण्यात यावी

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

देगलूर प्रतिनिधी/संतोष चिद्रावार लोणीकर

देगलूर तालुक्यातील मौजे झरी येथील ग्रामपंचायतीमध्ये विविध विकासकामांसाठी प्राप्त झालेल्या निधीच्या वितरणात मोठ्या प्रमाणात अनियमितता व आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा आरोप करत संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे. तक्रारीनुसार, ग्रामपंचायतीमार्फत राज्य शासन, केंद्र शासन तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांकडून प्राप्त झालेल्या विविध विकासनिधींचा वापर कागदोपत्री दाखविण्यात आला असला तरी प्रत्यक्षात अनेक कामे निकृष्ट दर्जाची, अपूर्ण किंवा अस्तित्वात नसल्याचा आरोप केवळबाई वाघमारे सरपंच यांनी केला आहे.

ग्रामविकासासाठी मंजूर झालेल्या निधीचा तत्कालीन , ग्रामसेवक व उपसरपंच सचिन पाटील, कंत्राटदार व काही गाव पुढाऱ्यांच्या संगनमताने अपहार झाल्याची शंका व्यक्त करण्यात आली आहे.

तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार, अनेक खर्चांच्या नोंदी संबंधित ग्रामसभेच्या मंजुरी शिवाय करण्यात आल्या असून काही निवडक व्यक्ती व व्यापाऱ्यांच्या नावावर बिले काढून निधीची उचल करण्यात आली. संबंधित व्यापाऱ्यांकडे शासनमान्य परवाने होते का, प्रत्यक्षात वस्तू किंवा सेवा पुरविण्यात आल्या होत्या का, याचीही चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

ग्रामपंचायतीच्या वित्त आयोग निधी, ग्रामनिधी तसेच इतर सर्व योजनांमधून मंजूर झालेल्या प्रस्तावांची प्रत्यक्ष पडताळणी करून एप्रिल २०२५ ते जून २०२६ या कालावधीतील जमा-खर्चाचा तपशील तपासावा, अशी मागणी तक्रारीत करण्यात आली आहे. याशिवाय, दाखविण्यात आलेल्या कामांची प्रत्यक्ष पाहणी करून व्हाऊचर, बिले आणि कामांची गुणवत्ता यांची तुलना करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

संबंधित प्रकरणात दोषी आढळणाऱ्या तत्कालीन ग्रामसेवक, उपसरपंच सचिन पाटील ,कंत्राटदार तसेच निधी स्वीकारणाऱ्या व्यक्तींवर कठोर कारवाई करून फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावेत, अशी मागणी झरी गावचे सरपंच केवळबाई मरीबा वाघमारे दि १७/०६/२६ रोजी गट विकास अधिकारी साहेब व पंचायत समिती देगलूर यांनी केली आहे. झरी ग्रामपंचायतीतील कथित आर्थिक गैरव्यवहाराची निष्पक्ष व सखोल चौकशी करून सत्य समोर आणावे, अशी अपेक्षा झरी गावचे सरपंच केवळबाई मरीबा वाघमारे यांनी गटविकास अधिकारी देगलूर यांना निवेदना मार्फत कळविले

------------------------------------------------------------

4) 15 वा वित्त आयोग सन 2022-23, सन 2023-24 व सन 2023-2024 मधिल सी.सी. नाली, सी.सी. रस्ता या कामाच्या फाईलवर सरपंच अस्तित्वात असताना उपसरपंच म्हणून स्वाक्षरी करणे, सदरील काम हे अंदाज पत्रकानूसार न करणे, विद्यमान उपसरपंच यांची परस्पर वापर करून बिले काढून घेणे हे अतिशय गंभीर बाब आहे. याची चौकशी करणे आवश्यक आहे.

# नांदेड-किनवट मार्गावरील नंदीग्राम एक्सप्रेसला वाढीव डबे जोडण्याची मागणी

## आमदार भीमराव केराम यांचे केंद्रीय रेल्वेमंत्र्यांना निवेदन; प्रवाशांची गैरसोय दूर* *करण्यासाठी तातडीने निर्णय घेण्याची मागणी

***लोकनेता न्यूज नेटवर्क***

*किनवट प्रतिनिधी शेख शौकत*

मराठवाडा, विदर्भ आणि तेलंगणा या भागांना जोडणाऱ्या महत्त्वाच्या रेल्वे मार्गावरील गाडी क्रमांक ११००१/११००२ नंदीग्राम एक्सप्रेसच्या डब्यांची संख्या वाढवून प्रवासी क्षमता पूर्ववत करण्याची मागणी किनवट-माहूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार भीमराव केराम यांनी केली आहे. याबाबत त्यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री यांना निवेदन पाठवून तातडीने कार्यवाही करण्याची विनंती केली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, रेल्वे प्रशासनाने नंदीग्राम एक्सप्रेसमध्ये एलएचबी डबे सुरू करताना एकूण डब्यांची संख्या १८ वरून कमी करून १६ केली असून, नॉन-एसी स्लीपर डब्यांची संख्याही ८ वरून ५ करण्यात आली आहे. त्यामुळे या मार्गावर प्रवास करणाऱ्या हजारो प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

मुंबई, ठाणे, कल्याण, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, किनवट, हिमायतनगर, भोकर, आदिलाबाद, चंद्रपूर, बल्लारशाह आदी भागांना जोडणारी नंदीग्राम एक्सप्रेस ही या परिसरातील नागरिकांसाठी जीवनवाहिनी ठरली आहे. विद्यार्थी, नोकरदार, शेतकरी, व्यापारी, रुग्ण आणि सामान्य प्रवासी मोठ्या प्रमाणात या रेल्वेवर अवलंबून आहेत.

मर्यादित रेल्वे पर्यायांमुळे या गाडीवर वर्षभर मोठी गर्दी असते. विशेषतः उन्हाळी सुट्ट्या, सण-उत्सव आणि लग्नसराईच्या काळात आरक्षित तसेच अनारक्षित डब्यांमध्ये मोठी गर्दी होत असून अनेक प्रवाशांना तिकीट मिळणे कठीण जाते. अशा परिस्थितीत डब्यांची संख्या कमी करणे हे प्रवाशांच्या हिताच्या दृष्टीने योग्य नसल्याचे आमदार केराम यांनी म्हटले आहे. नंदीग्राम एक्सप्रेसमध्ये पुन्हा प्रवासी क्षमता वाढवण्यासाठी खालीलप्रमाणे डब्यांची रचना करण्याची मागणी करण्यात आली आहे—

• १ प्रथम वातानुकूलित (First AC) डबा
• २वातानुकूलित द्वितीय श्रेणी (AC २ Tier) डबे • ३वातानुकूलित तृतीय श्रेणी (AC ३ Tier) डबे • ५ इकॉनॉमी श्रेणीचे डबे
• ८ स्लीपर श्रेणीचे (Non AC) डबे
• गरजेनुसार सामान्य व लगेज डबे

या निर्णयामुळे सामान्य, मध्यमवर्गीय तसेच वातानुकूलित प्रवाशांच्या गरजा पूर्ण होतील आणि किनवट-माहूरसह दुर्गम भागातील लाखो नागरिकांना मोठा दिलासा मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. रेल्वे प्रवाशांच्या सुविधेसाठी आणि या महत्त्वाच्या मार्गाची क्षमता वाढवण्यासाठी रेल्वे मंत्रालयाने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा आमदार भीमराव केराम यांनी व्यक्त केली आहे.

# पळसपूर सबटेशन अंतर्गतचा विज पुरवठा सुरळीत करावा

## ; अन्यथा डीजीटल मीडीया संपादक पत्रकार संघटनेचा आंदोलनाचा इशारा.

**दै. लोकनेता न्यूज नेटवर्क**

हिमायतनगर लक्ष्मण शेन्नेवाड

हिमायतनगर. तालूक्यातील पळसपूर ३३ के व्हि उपकेंद्र सबस्टेशन अंतर्गत विद्यूत महावितरण कार्यालयाकडून विज पुरवठा सुरळीत होत नसल्याने नागरीक त्रस्त झाले आहेत. वारंवार विनंत्या अर्ज करूणही विज पुरवठा सुरळीत होत नसल्याने नागरीकांच्या भावना अतिव झाल्या आहेत. खोळबंलेला विज पुरवठा सुरळीत करावा. अन्यथा महावितरण कार्यालयाच्या विरोधात तिव्र आंदोलन छेडण्यात येईल. असा इशारा डिजीटल मिडीया संपादक पत्रकार संघटना तालूका अध्यक्ष नागोराव शिंदे पळसपुरकर, चांदराव वानखेडे, विठ्ठलराव गायकवाड ,शंकर गायकवाड यांनी कार्यकारी अभियंता मंगेश बोरगावकर भोकर यांना पत्राद्वारे दिला आहे.




कार्यकारी अभियंता कार्यालय भोकर यांना दिलेल्या निवेदनात शिंदे यांनी म्हटले आहे की, पळसपूर येथील सबटेशन मधून वारंवार विज पुरवठा खंडीत होत आहे. महावितरण कंपनीकडून आठ तासाचे भारनियमण व भारनियमना व्यतिरीक्त विज पुरवठा खंडीत होत असल्याने पिण्याच्या पाण्याची सोय होत नाही. शालेय विद्यार्थ्याबरोबर शेतकर्याना या महावितरणच्या सुलतानी कारभाराचा त्रास होत आहे. वरिष्ठांनी या गंभीर बाबींकडे तातडीने लक्ष वेधून या ठिकाणचा विज पुरवठा सुरळीत करावा. अशी मागणी नागोराव शिंदे,चांदराव वानखेडे, विठ्ठलराव गायकवाड यांनी गावकरी नागरीकांच्या वतीने केली असून,तातडीने कार्यवाही न झाल्यास महावितरणच्या विरोधात तिव्र आंदोलन छेडण्यात येईल. असा इशाराही देण्यात आला आहे.

# तहसील कार्यालयात कर्मचाऱ्याची दादागिरी; मोबाईल हिसकावल्याने तणाव, झटापटीत बाळ खाली पडले



**लोकनेता न्यूज नेटवर्क**

वैजापूर प्रतिनिधी : अर्जुन शिंदे

वैजापूर तहसील कार्यालयासमोर उपोषणाला बसलेल्या शेतकरी व ग्रामस्थांमध्ये मंगळवारी (१६ जून) तणावाचे वातावरण निर्माण झाले. आंदोलनाचे चित्रीकरण करणारा मोबाईल एका कर्मचाऱ्याने हिसकावल्याचा आरोप करण्यात आला. यानंतर झालेल्या शाब्दिक वादाचे रूपांतर झटापटीत झाले. या गोंधळात एका महिला आंदोलकाचे लहान बाळ खाली पडल्याने उपस्थितांमध्ये संतापाची लाट उसळली.

वाकला व तलवाडा येथील ग्रामस्थांनी शिवरस्ता मोकळा करून देण्याच्या मागणीसाठी तहसील कार्यालयासमोर उपोषण सुरू केले आहे.

या प्रकरणी तहसीलदार सुनील सावंत यांनी सुनावणी ठेवली होती. मात्र ते गैरहजर राहिल्याने आंदोलकांमध्ये नाराजी निर्माण झाली.

दुपारी सुमारे चार वाजण्याच्या सुमारास आंदोलनाचे चित्रीकरण सुरू असताना एका कर्मचाऱ्याने मोबाईल हिसकावल्याचा आरोप आंदोलकांनी केला. यानंतर संबंधित कर्मचारी व आंदोलक महिलांमध्ये शाब्दिक चकमक झाली. परिस्थिती चिघळून झटापट सुरू झाली. यावेळी एका महिला आंदोलकाचे लहान बाळ खाली पडले. सुदैवाने बाळाला कोणतीही गंभीर दुखापत झाली नसल्याचे सांगण्यात आले. घटनेनंतर संतप्त शेतकरी आणि महिलांनी प्रशासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी करत संबंधित कर्मचाऱ्याला तात्काळ निलंबित करण्याची मागणी केली. काही काळ तहसील कार्यालय परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते.

अखेर नायब तहसीलदार सूरज कुमावत यांनी आंदोलकांची भेट घेऊन प्रकरणाची सुनावणी केली. तसेच बुधवारी (१७ जून) महसूल विभागाचे अधिकारी प्रत्यक्ष घटनास्थळी भेट देऊन रस्त्याची पाहणी करतील, असे आश्वासन दिले. मात्र, मागणी पूर्ण होईपर्यंत आंदोलन सुरूच ठेवण्याचा इशारा शेतकरी व ग्रामस्थांनी दिला असून प्रशासनाच्या पुढील भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# पहिल्याच तुरळक पावसात रस्त्यावर चिखलाचे साम्राज्य; दुचाकी चालकाचे अपघाताचे प्रमाण वाढले



"प्रशासनाने या गंभीर समस्येकडे त्वरित लक्ष देऊन तात्काळ उपाययोजना करावी व नागरिकांना, वाहन धारकांना या समस्येतून मुक्तता करावी "
सौ. अनिता नंदराम धिकार सरपंच कुटंगा*

मुख्य रस्त्यावर टाकण्यात आलेला गिट्ठी आणि मुरूम तसाच पडून राहिल्याने पावसाच्या पाण्यामुळे या मुरुमाचा चिखल झाला आहे. हा पसरलेला गिट्ठी-मुरूम रस्त्यावरून तातडीने हटवण्यात यावा, अशी आग्रही मागणी आता स्थानिक नागरिकांकडून व वाहनधारकांकडून केली जात आहे.

पावसाळा सुरू झाल्यामुळे आता या दिवसांत नवीन रस्ता बनवणे पूर्णपणे अशक्य झाले आहे. त्यामुळे प्रशासनाने रस्ता पूर्ण बनवण्याची वाट न पाहता, किमान रस्त्यावरील चिखल साफ करून आणि साचलेला मुरूम बाजूला करून तात्पुरती का होईना वाहतूक सुरळीत करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
धारणी प्रतिनिधी - रजनिश साकले

कुटंगा - सुरुवातीचा तुरळक सरीमध्ये वातावरणात गारवा आणला असला तरी येथील नागरिक वाहनधारकासाठी मात्र हा पाऊस डोकेदुखी ठरला आहे. पहिल्याच पावसामुळे मुख्य रस्त्याची दुरावस्था झाली असून, संपूर्ण रस्त्यावर चिखलाचे साम्राज्य पसरले आहे. यामुळे वाहतुकीची मोठी समस्या निर्माण झाली असून नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

प्राप्त माहितीनुसार रस्त्यावर झालेल्या प्रचंड चिखलामुळे दुचाकी व इतर वाहने घसरण्याचे प्रमाण वाढले आहे. विशेषतः मोटर सायकलचे अपघात होत असून अनेक वाहनधारक चिखलात घसरून जखमी झाले आहेत. या चिखलातून वाट काढताना कसरत करावी लागत आहे.

# शाळा सुरू होताच गणवेश महागले! पालकांच्या खिशाला कात्री

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

*देगलूर प्रतिनिधी/संतोष चिद्रावार लोणीकर

नवीन शैक्षणिक वर्षाला 15 जून पासून सुरुवात झाली असून शाळांच्या परिसरात विद्यार्थ्यांचा किलबिलाट पुन्हा ऐकू येऊ लागला आहे. मात्र शाळा सुरू होतात स्कूल युनिफॉर्मच्या वाढलेल्या किमतीमुळे पालकांची चिंता वाढली आहे. यंदा स्कूल युनिफॉर्मच्या दरात सरासरी दहा टक्के पर्यंत वाढ झाल्याचे विक्रेते व टेलर यांनी सांगितले आहे. कापडाच्या वाढत्या किमती, वाहतूक खर्चातील वाढ आणि शिलाई शुल्क महागल्यामुळे युनिफॉर्म चे दर वाढल्याचे व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे. गेल्या वर्षभरात युनिफॉर्म तयार करण्यासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाच्या किमती सातत्याने वाढल्या असून डिझेल



दरवाढीमुळे वाहतूक खर्चही वाढला आहे. याचा थेट परिणाम युनिफॉर्मच्या अंतिम किमतीवर झाला आहे. विशेषता; इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये विशिष्ट डिझाईन, लोगो आणि ठराविक कापडाचे ड्रेस वापरले जात असल्याने त्या शाळांतील विद्यार्थ्यांच्या युनिफॉर्म ची किंमत अधिक वाढली आहे. प्राथमिक ते उच्च माध्यमिक स्थरापर्यंतच्या विद्यार्थ्यांच्या युनिफॉर्म साठी पालकांना गेल्या वर्षाच्या तुलनेत अधिक खर्च करावा लागत आहे. यापूर्वीच पुस्तके, वह्या, स्टेशनरी आणि इतर शैक्षणिक साहित्याच्या वाढत्या किमतीमुळे पालकांचे बजेट विस्कळीत झाले असताना, युनिफॉर्मच्या दरवाढीने त्यात आणखी भर पडली आहे. अनेक पालकांनी शाळा प्रशासनाने युनिफॉर्म खरेदीसाठी अधिक पर्याय उपलब्ध करून द्यावेत अशी मागणी केली आहे.

## कापड वाहतूक व शिलाई खर्च वाढल्याने वाढले दर

दरम्यान विक्रेत्यांच्या मते शाळा सुरू झाल्याने युनिफॉर्म विक्रीला वेग आला असून व्यवसायावर फारसा परिणाम झालेला नाही. मात्र वाढत्या उत्पादन खर्चामुळे मर्यादित दरवाढ करावी लागल्याचे त्यांनी स्पष्ट केले. भविष्यात कच्चामाल व वाहतूक खर्चात आणखी वाढ झाल्यास युनिफॉर्मचे दर पुन्हा वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

--------------------------------------------------

# आमरण उपोषणाच्या इशाऱ्यानंतर प्रशासन नमले! 01 ऑगस्टपर्यंत अंमलबजावणी न झाल्यास पुन्हा रणशिंग"

## जिल्हाधिकारी कार्यालयाचा आदेश म्हणजे नागरिकांचा विजय, पण अजून लढाई बाकी! -बोरशे गुरुजी

**दै.लोकनेता न्यूज नेटवर्क**

भोकरदन डॉ. ज्ञानेश्वर जगताप

करजगाव ता. भोकरदन): माहिती अधिकार कायद्याला पायदळी तुडवणाऱ्या भ्रष्ट अधिकाऱ्यांना धडा शिकवण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते श्री. कडुबा विनायकराव बोरशे गुरुजी यांनी दि. 04/06/2026 रोजी आमरण उपोषणाचा इशारा दिला होता. या इशाऱ्यानंतर प्रशासनाला जाग आली आणि दि. 07/06/2026 रोजी जावक क्र. 1471 अन्वये जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांनी अखेर आदेश काढलाच.

प्रशासनाला दिलेली 'अंतिम मुदत' आणि आदेशातील ठळक बाबी:

1. माहिति अधिकार कायदा 2005 कलम 4(1)(b) ची आठवण: 20 वर्षांपासून धूळ खात पडलेल्या कायद्याची प्रशासनाला उपोषणाच्या धाकाने आठवण करून द्यावी लागली. या कलमानुसार 1 ते 17 मुद्द्यांची माहिती स्वतःहून वेबसाईट व कार्यालयाबाहेर फलकावर लावणे बंधनकारक आहे, असे आदेशात ठणकावून सांगितले आहे.
2. 01/08/2026 ची डेडलाईन: सर्व विभाग प्रमुख, उपविभागीय अधिकारी व तहसिलदारांना 60 दिवसांची अंतिम मुदत देण्यात आली आहे. या तारखेपर्यंत प्रत्येक कार्यालयाबाहेर माहितीचा फलक झळकलाच पाहिजे.
3. 25/08/2026 - उपोषणाचा दिवस: जर प्रशासनाने टाळाटाळ केली, तर 25 ऑगस्ट 2026 रोजी सकाळी 10 वाजता करजगांव ग्रामपंचायतसमोर आमरण उपोषण सुरू होणार, हे प्रशासनाने लेखी मान्य केले आहे.



श्री. कडुबा बोरशे गुरुजींचा हल्लाबोल: "हा आदेश म्हणजे माझा वैयक्तिक विजय नाही, तर माहिती लपवून भ्रष्टाचार करणाऱ्या व्यवस्थेच्या थोबाडीत मारलेली चपराक आहे. 20 वर्षे कायदा असूनही जनता माहितीसाठी हेलपाटे मारत होती, अपील करत होती. शासनाचा वेळ आणि जनतेचा पैसा वाया जात होता. आता एकही अधिकारी 'माहिती नाही' म्हणू शकणार नाही. माहिती फलकावर लावावीच लागेल."

"जिल्हाधिकारी कार्यालयाने अतिशय सकारात्मतेने आदेश काढला आहे. आता पर्यंत स्वत:होऊन हे करायला पाहिजे होते. असो माझी कलम 4 ची अंमल बजावणीची मागणी मान्य करावीच लागली. हा प्रशासनाचा पराभव आहे."अंमलबजावणी झाल्यास कार्यालयीन शिस्त नक्कि येईल. कोणत्या कर्मचाऱ्याकडे कोणते काम व ते किती दिवसात पुर्ण होणार याची नागरीकांना माहिती होईल.सरकारी निधीतुन होणाऱ्या कामाची सर्व माहिती मिळेल असे बोरशे गुरुजी म्हणाले.

"यापुढे एकही दिवस जास्त खपवून घेणार नाही. 01 ऑगस्ट 2026 ला सायंकाळी 5 वाजेपर्यंत जालना जिल्ह्यातील प्रत्येक कार्यालयाबाहेर 17 मुद्द्यांचा बोर्ड दिसला पाहिजे. नाहीतर 25 ऑगस्टला उपोषण अटळ आहे. आणि या वेळी फक्त मी एकटा नसेन, तर संपूर्ण राज्य माझ्यासोबत असेल." हा आदेश म्हणजे फक्त सुरुवात आहे. माहिती अधिकाराची लढाई आता थेट जनतेच्या दारात पोहोचली आहे. प्रशासनाने काम केले नाही, तर परिणामांना तयार राहावे. माहिती अधिकार कार्यकर्ते ही यात सहभागी आहेत.

संपर्क:
श्री. कडुबा विनायकराव बोरशे (बोरशे गुरुजी)
रा. करजगांव, पो. पिंपळगांव रेणुकाई, ता. भोकरदन, जि. जालना
मो. 9403500477

# घरकुल आवास योजनेतील लाभार्थ्यांना बांधकाम पूर्ण होऊनही बिले पडत नाहीत,

## घरकुल आवास योजनेत निधीचा ठणठणाट घर पूर्ण बांधूनही हप्ता पडत नही पावसाळ्याच्या तोंडावर अनेकांची घरे पाडलेली निधी अभावी बांधकाम बंद ...

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
जीवन जाधव औसा

औसा तालुक्यात प्रधानमंत्री व मोदी आवास घरकुल योजनेअंतर्गत हजारो घरकुलांचे उद्दिष्ट देण्यात आले होते तेवढ्याच घरकुलांना मंजुरी देण्यात आली होती त्यापैकी अनेक घरकुल पूर्ण ही झाली काही घरकुल अजूनही अपूर्ण आहेत मागील चार महिन्यापासून तालुक्यात प्रधानमंत्री मोदी आवास योजनेस निधी मिळाल्या नसल्यामुळे ठणठणात निर्माण झाला असल्याने परिणामी लाभार्थी अडचणीत सापडले आहेत

प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत चार टप्प्यात हा निधी प्रशासनाकडून वितरित केला जातो मात्र चार महिन्याच्या पूर्वी काही लाभार्थ्यांना एक -दोन हप्ता मिळाला होता मात्र चार महिने उलटूनही काहींना दुसरा काहींना तिसरा हप्ता मिळत नसल्याने घरकुल लाभार्थी अडचणी सापडले आहेत लाभार्थ्यांनी आपली घरी राहते घरे घरकुलासाठी तोडल्याने ऐन पावसाळ्यामध्ये परिवारास निसर्गाच्या पावसाळ्यायपुर्वी घरकुल घरात राहण्याचे



स्वप्न पुर्ण होत नसल्याने अडचणीचा सामना करावा लागणार आहे लाभार्थी ग्रामपंचायत व पंचायत समिती येथे चकरा मारून बेजार झाले आहेत मात्र सरकारकडे योजनेमध्ये पैसे उपलब्ध नसण्याचे कारण देत असल्याने लाभार्थी अधिकचे अडचणीत सापडले आहेत

तसेच आपली रहायचे घर पाडून आजूबाजूला भाड्याने राहावे लागत असल्याने आर्थिक भुर्दंड बसत असल्याने तेही नुकसान सहन करण्याची वेळ आता घरकुल लाभार्थ्यावर येऊन ठेपले असल्याने नागरिकात रोष वाढत आहे याबाबतीत घरकुलांचे बिले लवकरात लवकर पडावे व पावसा आधी आमचे घरकुल तयार होऊन आम्हाला त्या घरकुलामध्ये राहण्याची सोय व्हावी अशी मागणी सर्वसामान्य नागरिकांतून केली जाते,

सरकारच्या घरकुल बांधकामासाठी आपल्या पदरचे पैसे घालून बांधकाम करून जर हफ्ते पडतच नसतील तर घरकुल योजना काय कामाची असं सर्वसामान्यातून बोलले जाते व घरकुलांचे बिले काढण्यासाठी मध्यस्थींना पैसे देऊन घरकुलांची बिले काढावे लागत असल्याचं ग्रामीण भागात तील ग्रामस्थातून सरास बोलले जाते, एक तर घरकुल बांधणीसाठी तुटपुंजी आर्थिक मदत व त्या आर्थिक मदतीने घरकुल पूर्ण होत नसल्याने व खोकलांचे हप्ते वेळेवर पडत नसल्याने नागरिकांत नाराजीचा सूर आहे,,,,,



# जाहिरनामा

**जन्म मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र मिळणेबाबत**
**जन्म आणि मृत्यूची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११ अन्वये**

सर्व जनतेस तालुका अंबाजोगाई यांना जाहीर केले जाते की, **श्री. आकाश दत्तात्रय कसवे,** रा. मिरवट मांडवा, ता. परळी वैजनाथ, जि. बीड यांचा मुलगा नामे तुषार आकाश कसवे यांचा जन्म दिनांक 03.08.2024 रोजी स्वा. रा. ती. प्रा. रुग्णालय, अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड येथे झाला असून अर्जदारांनी त्यांच्या सदर कायदेशीर जन्म नोंदीबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणून या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करिता सदर अर्जदाराचे कायदेशीर जन्म दिनांक 13.10.2023 कायदेशीर नसल्याचे असे कोणास समजवायचे असेल तर या जाहिरनाम्याच्या प्रसिद्धी तारखेपासून 15 दिवसांच्या आत त्यांनी या कार्यालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात. तसेच लेखी स्वरूपातही कळविण्यात यावे की, जर सदर मुदतीत कोणी योग्य हरकत दाखवली नाही तर सदर कार्यालय अर्जदार यांच्या हक्काबद्दल लागलेले पुरावे घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदर अर्जदार यांची जन्म नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

**कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसीलदार, अंबाजोगाई**


# पहाडी पारगाव येथील जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात

## दहा दिवसांत शिक्षकांची रिक्त पदे न भरल्यास मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालयात शाळा भरवणार.

**दै. लोकनेता न्यूज नेटवर्क**
किल्ले धारूर /अविनाश जगताप

तालुक्यातील पहाडी पारगाव येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत शिक्षकांच्या तीव्र कमतरतेमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात आले असून, रिक्त पदे तातडीने भरावीत या मागणीसाठी शाळा व्यवस्थापन समितीने जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे निवेदन सादर केले आहे. तसेच पुढील दहा दिवसांत शिक्षकांची नियुक्ती न झाल्यास जिल्हा परिषद कार्यालयात शाळा भरवण्यात येईल असा इशाराही देण्यात आला आहे.





शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ज्ञानदेव मुंडे व उपाध्यक्ष बाळकृष्ण अंडील, सटवा आश्रुबा अंडील,गणेश धर्मराज मुंडे व कृष्णा लक्ष्मन मुंडे यांनी ग्रामस्थांच्या वतीने निवेदन सादर केले आहे.निवेदनात म्हटले आहे की, पहाडी पारगाव येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतचे वर्ग सुरू आहेत. मात्र, संपूर्ण शाळेची जबाबदारी सध्या केवळ एका शिक्षकावर असल्याने विद्यार्थ्यांच्या अध्यापनावर गंभीर परिणाम होत आहे. सन २०२४-२५ च्या संचमान्यतेनुसार शाळेत मुख्याध्यापक, प्राथमिक पदवीधर शिक्षक आणि सहाय्यक शिक्षक अशी एकूण चार पदे रिक्त आहेत. या रिक्त पदांमुळे विद्यार्थ्यांना नियमित अध्यापन, विषयवार मार्गदर्शन आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळण्यात अडचणी निर्माण झाल्या आहेत. परिणामी विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणावर शैक्षणिक नुकसान होत असल्याची खंत समितीने व्यक्त केली आहे.

शिक्षण हा विद्यार्थ्यांचा मूलभूत हक्क असून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही दर्जेदार शिक्षण मिळणे आवश्यक आहे. मात्र शिक्षकांच्या कमतरतेमुळे शाळेतील शैक्षणिक वातावरणावर विपरीत परिणाम होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने तातडीने रिक्त शिक्षक पदे भरून विद्यार्थ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी शाळा व्यवस्थापन समितीने केली आहे. अन्यथा पुढील दहा दिवसांत सकारात्मक निर्णय न झाल्यास संपूर्ण शाळा व्यवस्थापन समितीच्या वतीने जिल्हा परिषद कार्यालयात विद्यार्थी बसवून शाळा भरवण्यात येईल.असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे. निवेदनावर अध्यक्ष ज्ञानदेव मुंडे, उपाध्यक्ष बाळकृष्ण अंडील, सटवा अंडील, गणेश मुंडे, कृष्णा मुंडे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. दरम्यान, पहाडी पारगाव येथील ग्रामस्थ, पालक व विद्यार्थ्यांनीही प्रशासनाने या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेऊन त्वरित शिक्षकांची नियुक्ती करावी, अशी मागणी केली आहे. शाळेतील शिक्षकांचा तुटवडा दूर झाल्यास विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टळून शाळेची शैक्षणिक गुणवत्ता उंचावण्यास मदत होणार असल्याचे मत पालकांनी व्यक्त केले आहे.

# पाथर्डी तालुक्यात भामट्यांचा नवा फंडा; 'जेवर चमकाकर देंगे' सांगून महिलेचे सोने घेऊन भामटे पसार

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
अहिल्यानगर/

पाथर्डी- तालुक्यातील आगसखांड येथे दागिने व भांडी स्वच्छ करून देण्याचे आमिष दाखवत दोन अज्ञात भामट्यांनी एका महिलेची सुमारे 58 हजार रुपये किमतीच्या 18 ग्रॅम सोन्याच्या दागिन्यांची फसवणूक केल्याची घटना सोमवारी (दि. 15) सकाळी घडली. याप्रकरणी पाथर्डी पोलीस ठाण्यात अज्ञात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विजया सिताराम कदम (वय 46, रा. आगसखांड) या सोमवारी सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास घरासमोर उभ्या होत्या. त्यावेळी दोन अनोळखी व्यक्ती त्यांच्या घरी आले. त्यांनी हिंदी भाषेत बोलत आपण एका कंपनीतर्फे भांडी व सोन्याचे दागिने स्वच्छ करण्याच्या पावडरची जाहिरात करण्यासाठी




आल्याचे सांगितले. तसेच दागिने व भांडी चमकवून देऊ, पैसे नंतर द्या, असे सांगून विश्वास संपादन करण्याचा प्रयत्न केला. महिलेने घरात कोणी नसल्याचे सांगून त्यांना नंतर येण्यास सांगितले. मात्र त्या दोघांनी पांढऱ्या व गुलाबी रंगाच्या पावडरच्या पुड्या काढून त्याचे प्रात्यक्षिक दाखविले. त्यानंतर काही वेळासाठी फिर्यादींना काय घडले हे समजले नाही. दरम्यान, त्यांची सून निकिता घराबाहेर आल्यानंतर दागिने कुठे आहेत, अशी विचारणा केली. त्यावेळी महिलेने गळ्यातील व कानातील दागिने तपासले असता ते गायब झाल्याचे निदर्शनास आले.या घटनेत 25 हजार रुपये किमतीचे आठ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मनी-मंगळसूत्र, 18 हजार रुपये किमतीचे सहा ग्रॅम वजनाचे सोन्याचे वेल आणि 15 हजार रुपये किमतीचे चार ग्रॅम वजनाचे सोन्याचे झुंबर असे एकूण 58 हजार रुपयांचे दागिने अज्ञात भामट्यांनी फसवणुकीच्या उद्देशाने लंपास केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. याप्रकरणी पाथर्डी पोलीस -ठाण्यात दोन अज्ञात इसमांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस पुढील तपास करीत आहेत.

'हम लोग कंपनी की तरफ से बर्तन और जेवर साफ करने वाले पाउडर का प्रचार करने आए हैं। आपके पास कोई बर्तन या गहने हों तो दीजिए, हम उन्हें चमकाकर देंगे। पैसे भी अभी नहीं, 20 तारीख को दे देना।' असे म्हणणाऱ्या अनोळखी व्यक्तींना महिलेने 'घर में कोई नहीं है, मुझे आपकी भाषा समझ में नहीं आती, आप बाद में आइए।' असे सांगितले. मात्र भामट्यांनी पांढऱ्या व गुलाबी रंगाच्या पावडरच्या पिशव्या दाखवत विश्वास संपादन केला. त्यानंतर काही वेळातच महिलेच्या गळ्यातील व कानातील सोन्याचे दागिने गायब झाल्याचे निदर्शनास आले

# ठेवेदाराची फसवणूक प्रकरणी मुक्ताई अर्बनचे शिवप्रसाद सक्राते यांच्यासह 17 जणांवर आणखी एक गुन्हा दाखल

## वारंवार गुन्हे दाखल होऊनही आरोपीं मोकाट पोलिसावर संशयाची सुई

लोकनेता न्यूज नेटवर्क

माजलगाव प्रतिनिधी :

माजलगाव शहर पोलीस ठाण्यात बंधने मुक्ताई अर्बन मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीशी संबंधित प्रकरणात संस्थेचे अध्यक्ष शिवप्रसाद सक्राते यांच्यासह 17 जणांविरुद्ध आणखी एक गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ठेवीदारांची फसवणूक, विश्वासघात, बनावट आश्वासने देऊन आर्थिक गैरव्यवहार केल्याप्रकरणी भारतीय न्याय संहिता (बीएनएस) तसेच महाराष्ट्र ठेवीदारांच्या हितसंरक्षण अधिनियमांतर्गत हा गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

फिर्यादीने दिलेल्या तक्रारीनुसार, संबंधित संस्थेने आकर्षक व्याजदर, सुरक्षित गुंतवणूक व मुदतपूर्तीनंतर रक्कम परत देण्याचे आश्वासन देत नागरिकांकडून मोठ्या प्रमाणावर ठेवी स्वीकारल्या होत्या. मात्र मुदत संपूनही ठेवीदारांना त्यांची रक्कम परत मिळाली नसल्याने अनेक गुंतवणूकदार आर्थिक अडचणीत सापडले आहेत. वारंवार पाठपुरावा करूनही समाधानकारक उत्तर मिळत नसल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

तपासादरम्यान संस्थेच्या विविध शाखांमधील आर्थिक व्यवहार, कागदपत्रे आणि ठेवीदारांच्या तक्रारींची छाननी करण्यात आली. प्राथमिक चौकशीत ठेवीदारांची दिशाभूल करून निधी उभारण्यात आल्याचे निष्पन्न झाल्याने संबंधित पदाधिकाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली. यापूर्वीही संस्थेविरोधात अनेक तक्रारी दाखल झाल्या असून, आता नव्याने दाखल झालेल्या गुन्ह्यामुळे संस्थेच्या अडचणीत आणखी वाढ झाली आहे.

पोलीसांनी दाखल केलेल्या गुन्ह्यात शिवप्रसाद सक्राते यांच्यासह एकूण 17 जणांचा समावेश असल्याची माहिती समोर आली आहे. या सर्वांवर भारतीय न्याय संहिता 2023 मधील फसवणूक, विश्वासघात, आर्थिक गैरव्यवहार आणि ठेवीदारांची फसवणूक यासंदर्भातील विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच महाराष्ट्र ठेवीदारांच्या हितसंरक्षण अधिनियम 1999 मधील कलम 3 व 4 चाही समावेश करण्यात आला आहे.

दरम्यान, अनेक ठेवीदारांनी आपल्या आयुष्यभराची बचत संस्थेत गुंतविल्याचा दावा केला आहे. काहींनी मुलांच्या शिक्षणासाठी, तर काहींनी शेती व व्यवसायासाठी राखून ठेवलेली रक्कम या संस्थेत ठेवली होती. परंतु रक्कम परत न मिळाल्यामुळे त्यांना मोठ्या आर्थिक संकटाला सामोरे जावे लागत असल्याचे सांगितले जात आहे.

या प्रकरणाचा तपास माजलगाव शहर पोलीस करत असून, आर्थिक व्यवहारांची सखोल चौकशी सुरू आहे. संबंधित आरोपींच्या मालमत्तेचा तपशील, संस्थेचे व्यवहार आणि ठेवीदारांच्या दाव्यांची पडताळणी केली जात आहे. तपास पूर्ण झाल्यानंतर आणखी धक्कादायक माहिती समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या कारवाईमुळे ठेवीदारांमध्ये न्याय मिळण्याची अपेक्षा निर्माण झाली असून, दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

: चौकट....

यांच्यावर झाले गुन्हे दाखल

माजलगाव येथील मुक्ताई अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडीट सोसायटीशी संबंधित आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक मंडळातील सदस्य तसेच कर्मचाऱ्यांसह एकूण १८ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून ठेवीदारांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे. गुन्हा दाखल झालेल्यांमध्ये अध्यक्ष विश्वांभर



पांडुरंग शिंदे, उपाध्यक्ष अशोक विठ्ठल जोगडे, संचालक विलास सौंदर, भागवत गंगात्रे, विशाल गोरे, केशव जोगडे, स्वाती सक्राते, अशोक चिगुरे, मोतीराम सिरसट, परमेश्वर कोरडे, शिवप्रसाद सर्जेराव सक्राते, विठ्ठल सक्राते, उद्धव जोगडे, महेश फल, किसन कुंडकर, बालाजी कुंडकर, कॅशिअर दीपक कटके तसेच रमेश उर्फ दगडुबा एकनाथ यादव यांचा समावेश आहे.

संबंधित प्रकरणात संस्थेच्या कामकाजात अनियमितता व आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. प्राथमिक चौकशीनंतर संबंधितांविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. तपास यंत्रणा विविध कागदपत्रांची छाननी करत असून गैरव्यवहाराची व्याप्ती किती आहे, याचा शोध घेतला जात आहे. दरम्यान, या प्रकरणामुळे ठेवीदार व सभासदांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले असून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे. तपास पूर्ण झाल्यानंतर आणखी धक्कादायक माहिती समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# नायगावमधील 'खत माफिया' विरुद्ध शेतकरी आक्रमक कृषी सेवा केंद्रांचे परवाने कायमस्वरूपी रद्द करण्याची मागणी

........

नायगाव माधव बैलकवाड

....................................

नायगाव तालुक्यातील खत विक्रेत्यांकडून शेतकऱ्यांची केली जाणारी लूट आणि साठ्यातील अफरातफर यांविरोधात शेतकरी पुत्र संघर्ष समिती व राष्ट्रवादी युवक काँग्रेसने आक्रमक पवित्रा घेतला आहे. नियमबाह्य कामकाज करणाऱ्या नायगावमधील सात प्रमुख कृषी सेवा केंद्रांचे निलंबन केवळ तात्पुरते न ठेवता ते 'कायमस्वरूपी रद्द' करावे, या मागणीसाठी विभागीय कृषी सहसंचालक (लातूर विभाग) महेशकुमार तीर्थकर यांना नुकतेच एक सडेतोड निवेदन देण्यात आले. जर राजकीय दबावापोटी या व्यापाऱ्यांना कोणताही दिलासा (स्टे) दिला गेला, तर लातूर कृषी सहसंचालक कार्यालयासमोर तीव्र जनआंदोलन आणि आमरण उपोषण करण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.

नायगाव तालुक्यात चढ्या दराने खत विक्री, युरिया व डीएपी खतांची साठेबाजी आणि सक्तीने निकृष्ट दर्जाची उत्पादने शेतकऱ्यांच्या माथी मारणे, असे प्रकार सुरू होते. या तक्रारींची दखल घेत कृषी विभागाने 'डम्मी ग्राहक' पाठवून केलेली तपासणी केली. यात सातही केंद्रांच्या कामकाजात गंभीर त्रुटी आढळल्याने त्यांचे परवाने सहा महिन्यांसाठी निलंबित करण्यात आले. मात्र, ही कारवाई अपुरी असून संघटित गुन्हेगारांना सुधारण्याची संधी नसून, केवळ पुढील हंगामापर्यंतची 'विश्रांती' असल्याचे आंदोलकांचे म्हणणे आहे.

आंदोलकांची प्रमुख मागणी : -

१. सातही दोषी कृषी सेवा केंद्रांचे परवाने खत नियंत्रण आदेश १९८५ नुसार कायमस्वरूपी रद्द करावेत.

२. व्यापाऱ्यांच्या अपीलावर कोणताही 'स्टे' देऊ नये.

३. मुखेड व नांदेडप्रमाणेच या व्यापाऱ्यांवर 'जीवनावश्यक वस्तू कायद्या'अंतर्गत (Es-



sential Commodities Act) फौजदारी गुन्हे दाखल करून अटकेची कारवाई करावी.

४. दोषी व्यापाऱ्यांना व त्यांच्या भागीदारांना कायमस्वरूपी 'ब्लॅकलिस्ट' करावे.

५. कागदोपत्री अस्तित्वात असणाऱ्या बोगस दुकानांची उच्चस्तरीय चौकशी करावी.

ज्या कृषी केंद्रांवर कारवाईची मागणी केली जात आहे, त्यात मे. गजानन कृषी सेवा केंद्र, मे. मातोश्री ॲग्रो एजन्सी, मे. वसंत ॲग्रो सर्व्हिस सेंटर, मे. हनुमान कृषी सेवा केंद्र, मे. शिवकृपा कृषी सेवा केंद्र, मे. दशरथ कृषी सेवा केंद्र आणि मे. केदार कृषी सेवा केंद्र यांचा समावेश आहे.

यावेळी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष गजानन पाटील होटाळकर आणि शेतकरी पुत्र संघर्ष समितीचे जिल्हाध्यक्ष बालाजी पाटील सांगवीकर यांनी प्रशासनाला खडसावले की, हे व्यापारी राजकीय नेत्यांच्या आडून कायद्याला वश करण्याचा प्रयत्न करत आहेत. आता यावर कृषी विभाग काय ठोस पावले उचलतो, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

या निवेदनाच्या प्रती पुणे येथील कृषी आयुक्तालयातील संचालक (निवीष्ठा व गुणनियंत्रण), नांदेडचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आणि जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकारी यांनाही पाठवण्यात आल्या आहेत.

## विडोळी फाट्यावर मंठा पोलिसांची धडक कारवाई; देशी दारूसह दुचाकी जप्त



लोकनेतान्युज नेटवर्क

जालना जिल्हा प्रतिनिधी

मंठा पोलीस ठाण्याच्या पथकाने अवैध दारू वाहतुकीविरोधात धडक कारवाई करत एका आरोपीला ताब्यात घेत 54 हजार 800 रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई 17 जून 2026 रोजी दुपारी 2.30 वाजण्याच्या सुमारास विडोळी फाटा येथे करण्यात आली.

याप्रकरणी गणेश गणपतराव गजानन (वय 45, रा. पाटोदा शंकरनगर, ता. मंठा, जि. जालना) याच्याविरुद्ध गुन्हा क्रमांक 326/2026 अन्वये कलम 65(अ)(इ) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीसांनी आरोपीच्या ताब्यातून देशी दारूच्या 48 बाटल्या (किंमत अंदाजे 4,800 रुपये) तसेच एक मोटारसायकल (किंमत अंदाजे 50,000 रुपये) असा एकूण 54,800 रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

अवैध दारू वाहतूक व विक्रीविरोधातील अशा कारवायांमुळे बेकायदेशीर धंदे करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली असून, मंठा पोलीसांची ही कारवाई परिसरात चर्चेचा विषय ठरत आहे.


## विजयाच्या गुलालापासून विकासाच्या शिखरापर्यंत... अवघ्या ५ महिन्यांत घणसोलीकरांच्या मनावर अधिराज्य गाजवणारे नाव – नगरसेवक सौरभ दादा शिंदे!

### विजयाच्या क्षणाने घणसोलीला मिळाली नवी आशा

दैनिक लोकनेता न्यूज़ नेटवर्क

| प्रतिनिधी-सुनिल पुलवळे

नवी मुंबई महानगरपालिका निवडणुकीचा निकाल जाहीर होत असताना सेक्टर ७ येथील मैदानात उत्सुकतेचे वातावरण निर्माण झाले होते. प्रत्येक फेरीसोबत नागरिकांची धडधड वाढत होती. प्रभाग क्रमांक ०९ मधील निकालाकडे संपूर्ण घणसोलीचे लक्ष लागले होते. अखेर विजयाची घोषणा होताच जल्लोषाला उधाण आले. गुलालाची उधळण, फटाक्यांची आतषबाजी आणि विजयाच्या घोषणा यामुळे संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. या विजयाने केवळ एक लोकप्रतिनिधी निवडून आला नाही, तर जनतेच्या आशा-अपेक्षांना नवे बळ मिळाले.



"जनतेची सेवा हाच माझा धर्म" या विचाराने कामाची सुरुवात

नगरसेवक म्हणून निवडून आल्यानंतर श्री. सौरभ दादा शिंदे यांनी "जनतेची सेवा हाच माझा धर्म" या भावनेने कामाला सुरुवात केली. आज अवघ्या पाच महिन्यांचा कार्यकाळ पूर्ण होत असताना प्रभाग क्रमांक ०९ मधील नागरिकांच्या प्रत्येक सुख-दुःखात सहभागी होणारा, त्यांच्या प्रत्येक अडचणीत खंबीरपणे उभा राहणारा लोकप्रतिनिधी म्हणून त्यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे.

नागरिकांच्या एका फोनवर तत्काळ मदतीसाठी हजर

दिवस असो वा मध्यरात्र... पाणी, वीज किंवा इतर कोणतीही नागरी समस्या उद्भवल्यास नागरिकांच्या एका फोनवर दादा स्वतः घटनास्थळी पोहोचल्याची अनेक उदाहरणे प्रभागातील नागरिकांनी अनुभवली आहेत. पाणीटंचाईच्या काळात टँकर उपलब्ध करून देणे, वीजपुरवठ्याच्या समस्यांवर तत्काळ पाठपुरावा करणे, नागरिकांच्या तक्रारींना प्राधान्य देणे ही त्यांची कार्यपद्धती जनतेचा विश्वास अधिक दृढ करणारी ठरली आहे.

विकासकामांच्या माध्यमातून बदलते प्रभागाचे चित्र

अवघ्या पाच महिन्यांत प्रभागातील विविध सहकारी गृहनिर्माण संस्थांमध्ये सिमेंट कॉंक्रीट रस्ते, सीसीटीव्ही कॅमेरे, परिसर सुशोभीकरण, स्वच्छता उपक्रम, मच्छर फवारणी तसेच नागरिकांच्या मागणीनुसार अनेक विकासकामे पूर्ण करण्यात आली आहेत. ज्येष्ठ नागरिकांसाठी कट्टे, वाचनालय आणि बसण्यासाठी बाकडे उभारून त्यांच्या दैनंदिन जीवनात आनंदाचे क्षण निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

आरोग्य आणि महिला सक्षमीकरणासाठी सातत्यपूर्ण उपक्रम

आरोग्य, महिला सक्षमीकरण आणि सामाजिक विकास या क्षेत्रातही सौरभ दादा शिंदे फाउंडेशनच्या माध्यमातून उल्लेखनीय काम सुरू आहे. मोफत नेत्रतपासणी शिबिरे, मोतीबिंदू शस्त्रक्रिया, दंत तपासणी, महिलांसाठी योग वर्ग, शिवणकला प्रशिक्षण, दुचाकी प्रशिक्षण आणि रोजगार मार्गदर्शन यांसारख्या उपक्रमांचा लाभ शेकडो नागरिक घेत आहेत. समाजातील विविध घटकांना सक्षम करण्याच्या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमांचे नागरिकांकडून विशेष स्वागत होत आहे.

सांस्कृतिक उपक्रमांतून घणसोलीच्या वैभवात भर

सांस्कृतिक क्षेत्रातही घणसोलीला नवी ऊर्जा मिळाली आहे. दहीहंडी, नवरात्रोत्सवातील मराठी दांडिया महोत्सव, हिंदू शोभायात्रा, दिवाळी रोषणाई आणि विविध सामाजिक-सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे घणसोलीच्या सांस्कृतिक वैभवात भर पडली आहे. समाजाला एकत्र आणणारे आणि सामाजिक सलोखा जपणारे हे उपक्रम नागरिकांच्या पसंतीस उतरले असून, परिसरात एकात्मतेचे वातावरण निर्माण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहेत.

जनतेच्या विश्वासाचे नाव बनलेले नेतृत्व

आज पाच महिन्यांचा कार्यकाळ पूर्ण होत असताना एक गोष्ट स्पष्टपणे जाणवते—सौरभ दादा शिंदे हे केवळ नगरसेवक नाहीत, तर जनतेच्या विश्वासाचे नाव आहेत. प्रत्येक नागरिकाला आपलेसे वाटणारे, त्यांच्या प्रश्नांना स्वतःचे प्रश्न समजून सोडवणारे आणि विकासाला सर्वोच्च प्राधान्य देणारे नेतृत्व म्हणून त्यांनी स्वतःची वेगळी छाप निर्माण केली आहे.

घणसोलीकरांच्या मनापासून सदिच्छा

दादा, गेल्या पाच महिन्यांत केलेल्या कार्याची पोचपावती संपूर्ण घणसोली देत आहे. पुढील काळातही आपल्या हातून अशीच लोकहिताची, विकासाभिमुख आणि प्रेरणादायी कामे घडत राहोत, हीच सर्व घणसोलीकरांची मनापासून सदिच्छा व्यक्त होत आहे.

विकास, विश्वास आणि सेवाभावाची नवी ओळख

जनतेच्या हाकेला धावून जाणारे नेतृत्व... विकास, विश्वास आणि सेवाभावाची नवी ओळख – नगरसेवक सौरभ दादा शिंदे!


# चर्मकार समाजाचा सुपुत्र भारतीय सैन्य दलात 'लेफ्टनंट'; महेश गंगासागरे यांचे देदीप्यमान यश

## पहिल्याच प्रयत्नात UPSC क्रॅक करत जि.प. शिक्षकाचा मुलगा भारतीय सैन्यात अधिकारी!

लोकनेता न्यूज नेटवर्क

हदगांव । चंद्रकांत भोरे

कामारी येथील चर्मकार समाजाचे नाव राष्ट्रीय पातळीवर उंचावणारी अभिमानास्पद कामगिरी समोर आली आहे. हदगाव तालुक्यातील जि.प. शाळा शिबदरा येथील सहशिक्षक श्री बालाजी गंगासागरे सर यांचे सुपुत्र महेश बालाजी गंगासागरे (कामारीकर) हल्ली मुक्काम वित्त नगर नांदेड यांनी डेहराडून येथील 'इंडियन मिलिटरी अकॅडमी' (IMA) मधील आपले खडतर प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केले आहे. १३ जून २०२६ रोजी पार पडलेल्या अंतिम दीक्षांत संचलनानंतर (पासिंग आऊट परेड) त्यांची भारतीय सैन्य दलात 'लेफ्टनंट' या अत्यंत मानाच्या आणि जबाबदारीच्या पदावर थेट नियुक्ती झाली आहे. त्यांच्या या उत्तुंग यशामुळे हदगावसह




संपूर्ण जिल्हाभरातून त्यांच्यावर कौतुकाचा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

लेफ्टनंट महेश गंगासागरे यांचा हा प्रवास अत्यंत जिद्दीचा आणि प्रेरणादायी आहे. २०१५ मध्ये त्यांनी इयत्ता सहावीत असतानाच प्रतिष्ठित 'सातारा सैनिक स्कूल'ची प्रवेश परीक्षा उत्तीर्ण केली होती. त्यानंतर त्यांनी आपले बारावीपर्यंतचे शिक्षण तेथेच पूर्ण केले.

बारावीत असतानाच, देशसेवेचे स्वप्न उराशी बाळगून त्यांनी UPSC तर्फे घेण्यात येणारी अत्यंत कठीण अशी 'एनडीए' (NDA) परीक्षा दिली. विशेष म्हणजे, पहिल्याच प्रयत्नात या परीक्षेत बाजी मारत त्यांनी 'एनडीए' खडकवासला (पुणे) येथे प्रवेश मिळवला. पुण्यात तीन वर्षांचे खडतर लष्करी शिक्षण पूर्ण केल्यानंतर, पुढील उच्च ऑफिसर प्रशिक्षणासाठी त्यांची 'आयएमए' (IMA) डेहराडून येथे निवड झाली. १३ जून रोजी हे प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण करून ते भारतीय भूदलात अधिकारी (लेफ्टनंट) म्हणून रुजू झाले आहेत. एका सामान्य शिक्षक पुत्राने स्वतःच्या कर्तृत्वावर मिळवलेले हे यश थक्क करणारे आहे.महेश यांच्या या ऐतिहासिक यशामुळे हदगाव येथील चर्मकार समाजात आनंदाचे वातावरण असून समाजबांधवांचा ऊर अभिमानाने भरून आला आहे. या यशाबद्दल राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे हदगाव तालुकाध्यक्ष विशाल घोडेकर यांच्यासह समाजातील प्रमुख मान्यवरांनी गंगासागरे परिवाराचे अभिनंदन केले आहे. अभिनंदन करणाऱ्यांमध्ये प्रामुख्याने हराळे सर, बालाजी सूर्यवंशी, दिलीप गंधारे, पांडुरंग देशमाने, अरविंद येलतवार, विलास सूर्यवंशी, अमोल गंगासागरे, चंद्रकांत सोनटक्के, बाळू गायकवाड, बाबुराव गंधारे आदींसह तालुक्यातील अनेक स्तरांतील नागरिकांचा समावेश आहे. महेश यांच्या रूपात चर्मकार समाजाला आणि नांदेड परिसराला थेट सैन्यातील एक उच्चपदस्थ अधिकारी मिळाल्याबद्दल सर्वत्र आनंदोत्सव साजरा केला जात आहे.

# सिंदखेड पोलिसांची तत्परता! जीवाची पर्वा न करता शॉक लागलेल्या शेतकऱ्याला दिले जीवनदान

दैनिक लोकनेता न्यूज़ नेटवर्क

*माहूर प्रतिनिधी - अविनाश पठाडे*

'खाकी' वर्दीच्या पाठीमागे एक संवेदनशील आणि धाडसी माणूस दडलेला असतो, याचा प्रत्यय पुन्हा एकदा नांदेडमध्ये आला आहे. सिंदखेड पोलिसांच्या सतर्कतेमुळे आणि धाडसी कृतीमुळे एका शेतकऱ्याचे प्राण वाचले असून, पोलिसांच्या या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे. १६ जून २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजताच्या सुमारास पोलीस स्टेशन सिंदखेड येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष जोंधळे, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक राठोड आणि पोलीस कॉन्स्टेबल संदीप वानखेडे हे शासकीय वाहनाने नियमित



पेट्रोलिंगसाठी वाई बाजारच्या दिशेने जात होते. दरम्यान, मौजे मनिरामथड शेतशिवारात त्यांना एक व्यक्ती शेतातील पाण्याच्या मोटारीच्या विद्युत तारेला चिकटल्याचे दिसून आले. त्या व्यक्तीला जोरात विजेचा धक्का (करंट) लागला होता. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी क्षणाचाही विलंब न करता आपले वाहन थांबवले. स्वतःच्या जीवाची पर्वा न करता, त्यांनी प्रसंगावधान राखून जवळील झाडाच्या लाकडाचा वापर केला आणि संबंधित व्यक्तीला विद्युत प्रवाहापासून सुरक्षितपणे दूर केले.

पोलिसांच्या या तत्परतेमुळे एक मोठा अनर्थ टळला. विद्युत प्रवाहातून सुटका केलेल्या व्यक्तीचे नाव दीपक पेटकुळे (रा. करंजी) असे आहे. पोलिसांनी त्यांना तात्काळ पुढील उपचारासाठी जवळच्या दवाखान्यात दाखल केले. सुदैवाने, सध्या त्यांची प्रकृती स्थिर असून त्यांच्यावर वैद्यकीय उपचार सुरू आहेत. पोलिसांनी दाखवलेली ही कार्यतत्परता, शौर्य आणि मानवतेच्या भावनेमुळे परिसरात सिंदखेड पोलिसांचे विशेष कौतुक होत आहे. या संकटसमयी देवदूतासारख्या धावून आलेल्या पोलिसांमुळे नागरिकांचा पोलीस दलावरील विश्वास आणखी दृढ झाला आहे. या धडाकेबाज कामगिरीबद्दल नांदेडचे पोलीस अधीक्षक श्री. अबिनाश कुमार यांनी संबंधित पोलीस अधिकारी व अंमलदारांचे विशेष कौतुक केले आहे.

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 7499615933

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ७४९९६१५९३३ .या अंकात प्रकाशित झालेल्या बातम्या व लेखा या मधून व्यक्त झालेल्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही (वाद विवाद गेवराई न्यायालयाअंतर्गत)